
M. H/MUL/03051/2012
ISSN-2319 9318

# विद्यावार्ता®

Peer Reviewed International Multilingual Research Journal

Issue-38, Vol-07 April to June 2021



Editor
Dr.Bapu G.Gholap

29

# सामाजिक वनीकरण : एक भौगोलिक अभ्यास

प्रा.डॉ. सुधाकर विठ्ठलराव वनवे
प्रमुख, भूगोलशास्त्र विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड

***********

सारांश

भारतामध्ये सामाजिक वनीकरण हा कार्यक्रम तत्कालीन सरकारने २६ जुन १९७५ साली २० कलमी या कार्यक्रमांच्या अंतर्गन प्रारंभित केला. त्याची खज्या अर्थाने सुरुवात ही १ जुलै १९७५ पासून झाली. पुढे त्यात १९८२, १९८६, २००६ या वर्षी बदल केला गेला. या कार्यक्रमात २० कलमे व ६५ उप कलमे आहेत. 'गरीबी हटाव' हे या कार्यक्रमाचे घोष वाक्य आहे. यातील प्रमुख २० कलमांमध्ये १५ व्या क्रमांकावर असलेल्य. कलमाअंतर्गत 'पर्यावरण व वनवृद्धी संरक्षण' या अंतर्गत 'सामाजिक वनीकरण कार्यक्रम' येतो.

महाराष्ट्र राज्यात १९९२ पासून हा कार्यक्रम अंमलात आला आणि पुढे त्याला चांगला प्रतिसाद मिळत गेला. ०१.०४.२००७ ते अद्यापपर्यंत हा कार्यक्रम अत्यंत चांगल्या पद्धतीने राबवला जात आहे. या अंतर्गत इंधन व इमारतीसाठी लाकूड पुरविणे, जनावरांना चारा उपलब्ध करुन देणे, शेतजमिनीचे संरक्षण, लोकांना करमणूकीसाठी उद्याने तयार करणे इ. महत्त्वाचे उद्देश डोळ्यासमोर ठेवले जातात. प्रस्तुत शोधनिबंधात सामाजिक वनीकरण या कार्यक्रमाचे स्वरुप काय आहे व त्याचे महत्त्व स्पष्ट करण्याचा प्रयत्न केला आहे.

**बीजसंज्ञा-** सामाजिक वनीकरण कार्यक्रम, प्रकार, फायदे.

**प्रस्तावना**

वनांचे महत्त्व आपण सर्वांनीच ओळखले आहे. जगाच्या पाठीवर काही देश असे आहेत की, त्यांची ओळख त्या देशामध्ये असलेल्या समृद्ध वनामुळे जगाला झाली आहे. सर्वसाधारणपणे एकूण भौगोलिक क्षेत्राच्या ३३ टक्के क्षेत्र वनाखाली असणे पर्यावरण संरक्षणाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचे आहे. आपल्या राज्यात २० टक्के क्षेत्राच्या जवळपास क्षेत्र वनाखाली आहे. जागतिक हवामान बदलाच्या पार्श्वभूमीवर विविध नैसर्गिक आपत्तींना सतत सामोरे जावे लागत आहे. वृक्ष पृथ्वीवरील वातावरण शुद्ध करण्याबरोबरच पर्यावरणाचा समतोल राखण्यास मदत करतात. आज विविध कारणामुळे प्रचंड प्रमाणावर निर्वनीकरण व त्याचे परिणाम पहावयास मिळतात. यामुळे पृथ्वीवरील सजीवांचे अस्तित्व पुढील काही वर्षात कठीण होण्याची शक्यता उद्भवली आहे. म्हणूनच संपूर्ण मानव जात व सजीव यांच्या दृष्टीने निर्वनीकरण या समस्येकडे गांभीर्याने पाहण्याची नितांत गरज आहे. आज वनसंपदेचा उपयोग अटळ आहे. मग एकीकडे निर्वनीकरण व दुसरीकडे वनसंपदेचा उपयोग ही तेढ कायम स्वरुपाची राहणार आहे. या प्रश्नांवर तोडगा काढण्यासाठी पर्यायी व्यवस्थेची गरज भासू लागली व ह्यातूनच 'सामाजिक वनीकरण' याचा उदय झाला. आज सामाजिक वनीकरण हे पडीक जमिनीचा कायापालट करण्याचे महत्त्वाचे साधन आहे. त्याची प्रभावी अंमलबजावणी महाराष्ट्र शासन करत आहे. त्याचे स्वरुप आपण समजून घेतले पाहिजे.

**अभ्यास क्षेत्र**

भारतातील २९ घटक राज्यांपैकी महाराष्ट्र हे एक महत्त्वाचे राज्य आहे. महाराष्ट्राचा अक्षांश विस्तार १५०४४' उत्तर अक्षवृत्त ते २२०६' उत्तर अक्षवृत्त आणि रेखांश विस्तार ७२०३६' पूर्व रेखावृत्त ते ८००५४' पूर्व रेखावृत्त असा असून क्षेत्रफळ ३०७७१३ चौ.कि.मी. आहे. महाराष्ट्राने देशाचा ९.३६ टक्के प्रदेश व्यापला आहे. महाराष्ट्राचा सर्वसाधारण आकार त्रिकोणाकृती असून दक्षिणेकडे चिंचोळा तर उत्तरेकडे रुंद होत गेलेला आहे. त्याचा पाया कोकणात व त्याचे निमुळते टोक पूर्वेकडे गोंदियाकडे आहे. महाराष्ट्राच्या वायव्य भागात गुजरात राज्य आणि दादर नगर हवेली हे संघराज्य क्षेत्र आहे. उत्तरेस मध्येप्रदेश, पूर्वेस छत्तीसगड तर आग्नेयेस आंध्रप्रदेश या राज्याच्या सीमारेषा आहेत. दक्षिणेस कर्नाटक व गोवा ही राज्य आहेत. महाराष्ट्रात सध्या ३६ जिल्हे असून त्याचे सहा प्रशासकीय विभाग आहेत. महाराष्ट्राची प्राकृतिक रचना वैशिष्ट्येपूर्ण असून कोकण किनारपट्टी, सह्याद्री पर्वत व महाराष्ट्र पठार असे तीन प्रमुख विभाग आहेत.

**उद्दिष्ट्ये**

i) सामाजिक वनीकरण कार्यक्रमाचे स्वरुप स्पष्ट करणे.

ii) सामाजिक वनीकरणाचे महत्त्व विशद करणे.

माहिती संकलन

सदरील संशोधन लेख हा द्वितीयक स्त्रोतावर आधारलेला असून यासाठी विविध संदर्भग्रंथ, वर्तमानपत्रातील लेख, मासिके इ. चा वापर करण्यात आला आहे.

**सामाजिक वनीकरणाचे फायदे**

या सर्व ठिकाणी शेती करणे तेवढे फायदेशिर नसल्यामुळे ही जागा सर्व दृष्टीकोनातून उत्तम ठरतात व त्याचे विवि उपयोग होतात.

१. नदी नाल्याच्या काठावर झाडे लावली तर पाण्याचा मार्ग नियंत्रित करता येतो. मृदेचे संवर्धन होते.

२. धरणाच्या आजुबाजूला झाडे लावल्याने धरणात साठलेल्या गाळाचे प्रमाण कमी होते.

३. लोहमार्ग व रस्तेमार्गाच्या दोन्ही बाजूंनी झाडे लावल्याने प्रवास सुखमय होतो.

४. शेतीच्या बांधावरील वृक्ष लागवडीमुळे मृदेची धूप कमी होते आणि वाऱ्यामुळे होणारे पिकांचे नुकसानही कमी होते.

५. पर्यावरणाचा समतोल राखण्याचे कार्य होते.

६. प्रदूषण नियंत्रणास हातभार लागतो.

७. पर्जन्यमान वाढण्यास मदत होते.

८. तापमान नियंत्रणास फायदा होतो.

९. मृदेची ओल टिकून राहते.

१०. पशूपक्षांना आश्रय मिळतो.

११. ग्रामीण भागात लाकूड पुरवठा गरज भागविता येते.

१२. कारखान्यासाठी कच्चा माल पुरविता येतो.

१३. नैसर्गिक वनावरील ताण कमी होतो.

सामाजिक वनीकरणामुळे अनेक फायदे होतात म्हणूनच शासनाने हा कार्यक्रम मोठ्या प्रमाणात राबवण्यास सुरुवात केली आहे. पण यांचे- गांभीर्य लोकापर्यंत तेवढ्या प्रभावीपणे पोहचले नाही.

**सामाजिक वनीकरणाचे प्रकार**

सामाजिक वनीकरण विशेषत: तीन प्रकारचे केले जाते, ते खालीलप्रमाणे सांगता येईल.

**१. शेतजमिनीवरील वनीकरण**

या वनीकरणात वाऱ्याचा जोर कमी करण्यासाठी केलेली लागवड, लाकूड मिळविण्यासाठी केलेली लागवड व गायरानात केलेली लागवड असा तीन प्रकाराचा समावेश होतो. वाऱ्याचा जोर कमी करण्यासाठी जेव्हा वनीकरण केले जाते तेव्हा त्याचे अनेक फायदे होतात. यामुळे मातीतील ओल जास्त काळ टिकून राहते. तसेच बाष्पीभवनाच्या प्रमाणात घट होते. अशा वनीकरणामुळे पिकांच्या उत्पादनात २५ ते ३० टक्के वाढ झालेली आहे. याशिवाय वायुरोधकामुळे प्रकाश संश्लेषणाची क्रियाही वाढल्याने पिके जास्त जोमाने वाढतात व मृदा धुपून जाण्याचे प्रमाण ही कमी होते. तसेच या झाडामुळे सर्पाचे प्रमाण वाढते व सर्प उंदराचे भक्षण करीत असल्याने उंदिराचे प्रमाण मर्यादित राहते. त्यामुळे पिकाची नासाडी कमी होते. पक्षांची संख्या वाढल्याने पिकांच्या संख्येवरही नियंत्रण येते.

**२. विस्तारित वनीकरण**

यात कालवे, धरणे, रस्ते, लोहमार्ग व पडीक जमिनीवरील लागवडीचा समावेश होतो. धरणांच्या आजुबाजूला लावलेल्या झाडांमुळे धरणात वाहून येणा-या गाळावर नियंत्रण राहते. बंधा-याच्या बांधावरील मातीची धूप कमी होते. तसेच रस्ते व लोहमार्गाच्या दोन्ही बाजूला आपण लागवड केली तर किती तरी मोठ्या प्रमाणावर वनीकरण शक्य होईल. याशिवाय सावली व हिरवळीतून जाणा-या मार्गामुळे प्रवास सुखद होईल. गावाच्या आजुबाजूला असलेल्या पडीक जमिनीत लागवड झाली तर हेच क्षेत्र गाव व वनराईने नटलेले व डोळ्याला समाधान देणारे दिसेल.

**३. नागरी वनीकरण**

शहरात डांबरी रस्ते, सिमेंट विटांचे बांधकाम, इ. मधून उत्सर्जित होणारी उष्णता इ. मुळे शहरी पर्यावरण अतिशय प्रदूषित असते. परंतु जर या शहरातील सार्वजनिक जागा, शाळा, महाविद्यालये, दवाखाने, कार्यालयाची आवारे यांचा उपयोग जर वनीकरणासाठी करणे शक्य झाले तर या कोरड्या व उष्ण वातावरणात एक शांत व थंड बेटच तयार करता येईल. अशी अनेक कंपन्यामध्ये व उद्योगसमुहामध्ये उदाहरणे पहावयास मिळतात.

**हवामान बदलानुसार वनस्पतीच्या जातीची निवड**

महाराष्ट्रात हवामानाच्या बदलानुसार कोणत्या वनस्पतीला कोणते हवामान पोषक राहिल त्याप्रमाणे निवड करुन वनस्पती उपयोगात आणल्या जातात. यामध्ये महाराष्ट्रामध्ये सुबाभूळ, सुरु, निलगिरी, बांबू, चिंच, कडूलिंब , वड, पिंपळ, साग, चंदन, चारोळी, महोगोनी, आवळा, हिरडा, बेहडा, करंजी, बदाम, जांभळ, आंबा, सिताफळ, अंजन, बिबा, खैर, काजू, फणस, ताड, शेवगा, हादगा, कडीपत्ता इ. वनस्पती व विविध प्रकारचे गवत उपयोगात आणले जाते. सध्या मुख्य रस्त्याच्या मध्यभागी वेगवेगळ्या फुलांची लागवड केली जात आहे व मुख्य रस्त्याला दोन्ही बाजूंनी उपरोक्त निर्देशित वृक्ष लागवड केली जाते.

अशा प्रकारे सामाजिक वनीकरण कार्यक्रमाचे स्वरुप व महत्त्व सांगता येईल. म्हणूनच लोकांना विश्वासात घेऊन त्यांना समजावून प्रामाणिकपणे सर्वांनी काम केले तर भविष्यात ही योजना फार मोठे वरदान ठरेल, एवढेच.

**निष्कर्ष**

१. सामाजिक वनीकरण कार्यक्रमाविषयी समाजात जागृती

निर्माण करणे आवश्यक आहे.

२. सामाजिक वनीकरण कार्यक्रम गावापर्यंत पोहचला आहे पण गावातील माणसापर्यंत पोहचणे आवश्यक आहे.

३. या अंतर्गत दलालांची संख्या वाढल्यामुळे काम प्रमाणिकपणे होत नाही असे वाटते.

४. या कार्यक्रमासाठी मिळणारी शासनाची आर्थिक मदत ते प्रलोभन न वाटता मदत वाटावी हे लोकांच्या मनात ठसवले पाहिजे.

५. यामध्ये अनुदान मिळते ते कशा पद्धतीने मिळते, त्यासाठी काय पद्धत आहे ही माहिती होतकरु पर्यंत पोहचतच नाही.

६. उद्दिष्ट्ये डोळ्यासमोर ठेवून वृक्षारोपण केलं जातं, पण नंतर त्याकडे दुर्लक्ष होताना दिसतं.

७. ज्या वृक्षास पोषक हवामान आहे अशा वृक्षाची निवड करण्यासाठीचे मार्गदर्शन होणे आवश्यक आहे.

८. सर्वांत महत्त्वाचा घटक पाणी याकडे लक्ष देणे आवश्यक वाटते.

एकंदरीत महाराष्ट्र शासनाने अतिशय उत्कृष्टरित्या सामाजिक वनीकरण कार्यक्रम राबवला आहे व त्याचे चांगले परिणाम भविष्यात निश्चित जाणवतील यात शंका नाही.

### संदर्भ ग्रंथ

१. पर्यावरण अभ्यास - यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक

२. पर्यावरण भूगोल - प्रा. शंकरराव शेटे, डॉ. पांडूरंग केचे, डॉ. सुरेश फुले, प्रा. ओमप्रकाश शहापूरकर

३. पर्यावरण भूगोल - डॉ. सावंत

४. पर्यावरण भूगोलशास्त्र - डॉ. घारपूरे

५. पागनीस रविकांत - पर्यावरणाची कथा आणि व्यथा

६. पर्यावरणाची ओळख - श्रीधर देशमुख

७. पर्यावरणशास्त्र- एरक भरुचा

८. पर्यावरण भूगोल - प्रा. शैलजा सांगळे

९. महाराष्ट्राचा भूगोल - डॉ. सुरेश फुले

❑❑❑

30

# हिन्दी सिनेमा और स्त्री का बदलता स्वरूप

डॉ. हरि किशोर यादव
पीएच.डी. हिंदी,
पटना वि. पटना

**********

हिन्दी सिनेमा का पहला विकास सन् १८९६ से १९३० तक है । यह मूक सिनेमा का समय है अगर छोटी –छोटी आकस्मिक गतिविधियो को छोड़ दे तो मूक सिनेमा के निर्माता दादा साहब फाल्के को हिन्दी सिनेमा का जनक माना जाता है इन्होने पहली मूक सिनेमा हरिश्चन्द्र बनायी । सन् १९३१ मे बोलती सिनेमा आलम आरा तेलगू मे भक्त प्रहलाद तथा तमिल मे कालिदास बनी तो सिनेमा का दूसरा उत्थान आरंभ हुआ । सन् १९३१से इस काल मे सिनेमा का लगातार विकास हुआ । लम्बे समय तक भारतीय भाषाओ की सिनेमा आदर्शवाद से प्रेरित रही, जो बाद मे यथार्थवाद की तरफ झुकाव बढा आगे चलकर मार्क्सवाद का कुछ असर हुआ। जो सिनेमा मे शोषण — उत्पीड़न की पोल खोलने लगी । जब साहित्य मे प्रगतिवाद चरम पर था और इप्टा पूरे देश मे फैल गया था तभी फिल्मों में इस विचारधारा का प्रभाव दिखायी पड़ता है । इप्टा के मजे हुए कलाकार फिल्मों में आये थे । वे निर्माता–निर्देशक,अभिनेता और गीतकार के रूप में सक्रिय हुए१ जब सन् १९४१ में हिन्दी के प्रसिद्ध कथाकार भगवतीचरण वर्मा के उपन्यास पर आधारित बिदार शर्मा के गीत–संगीत से भरी सिनेमा चित्रलेखा बनी थी। इसी नाम से इसी फिल्म का पुनर्निर्माण बिदार शर्मा ने ही सन् १९६४ में भी किया था, जिसमें चित्रलेखा की भूमिका मीना कुमारी ने निभाई थी । चालीस के दशक में बनी फिल्मों में गीत–संगीत पर काफी ध्यान दिया जाने लगा था२

2020 - 21

ISSN 2394-5303

Peer Reviewed International Multilingual Research Journ

# Printing@rea

Issue-76, Vol-02, May 2021




Editor
Dr.Bapu G.Gholap

2020 - 21

31

# मराठवाड्यातील लोकसंख्येच्या लिंगगुणोत्तर वैशिष्ट्यांचा भौगोलिक अभ्यास

प्रा.डॉ. सुधाकर विठ्ठलराव वनवे
प्रमुख, भूगोलशास्त्र विभाग,
कला व विज्ञान महाविद्यालय, चौसाळा, ता.जि. बीड

***********

**सारांश :-**

प्रस्तुत शोधनिबंधात मराठवाड्यातील बाललिंग गुणोत्तराचा अभ्यास केला आहे. लोकसंख्या संरचनेचा अभ्यास करत असतांना लोकसंख्येच्या लिंगरचनेला विशेष असे महत्त्व आहे. त्यातील महत्त्वपूर्ण भाग म्हणून बाललिंग गुणोत्तराकडे पाहिले जाते. बाललिंग गुणोत्तराच्या अभ्यासाशिवाय लिंगगुणोत्तरास परिपूर्णत: नाही म्हणून सदरील शोधनिबंधात महाष्ट्रातील विविध वैशिष्ट्यांनीयुक्त अशा मराठवाडा या विभागातील ० ते ६ वयोगटातील बाल लिंगगुणोत्तराचा जिल्हानिहाय विचार केला आहे. हा अभ्यास करत असतांना २००१ ते २०११ च्या जनगणनेनुसार ० ते ६ वयोगटातील दर १००० मुलांमागे मुलींचे प्रमाण कसे आहे, त्यामध्ये कसा बदल झाला आहे याचे स्पष्टीकरण करुन निष्कर्ष काढलेला आहे.

**बीजसंज्ञा :-** बाल लिंगगुणोत्तर, गुणोत्तरातील बदल

**प्रस्तावना :-**

एखाद्या विशिष्ट प्रदेशामध्ये लोकसंख्येमध्ये वाढ व घट होत असते. त्यामुळे लोकसंख्येच्या आकारात व संरचनेत बदल होतो. यामध्ये जनन, मृर्त्यता व स्थलांतर या घटकांची महत्त्वाची भूमिका असते. लोकसंख्या भूगोल याचा अभ्यास विविध मार्गाने करतो. लोकसंख्येची संरचना, अभिक्षेत्रीय वितरण, गतीमानता या घटकांना भूगोलात महत्त्व आहे. मानवाच्या जीवशास्त्रीय, सामाजिक व आर्थिक गुणवैशिष्ट्यांची माहिती लोकसंख्याशास्त्रातून जरी प्राप्त होत असली तरी त्यामध्ये क्षेत्रीय भिन्नतेचा विचार केलेला नसतो. लोकसंख्या भूगोलात मानवाच्या गुणवैशिष्ट्यांचा अभ्यास क्षेत्रानुसार केला जातो व त्यामधील क्षेत्रिय भिन्नतेस कारणीभूत असलेल्या घटकांची कारणमिंमासा स्पष्ट केलेली असते. लोकसंख्येची रचना पाहत असतांना वंश, जात, वर्ग, जन्म, मृत्यु, स्त्री-पुरुष, वयोगट, रक्तगट, अनुवंशिक गुणधर्म इ. जीवशास्त्रीय घटक अभ्यासले जातात. याशिवाय लोकसंख्या रचनेत सामाजिक व आर्थिक वैशिष्ट्यांचाही अभ्यास केला जातो. यात शिक्षण साक्षरता, विवाहस्थिती, धर्म, भाषा इ. चा समावेश होतो तर आर्थिक वैशिष्ट्यांमध्ये काम करणारी व काम न करणारी लोकसंख्या व्यवसायानुसार वर्गीकरण इ. अभ्यास केला जातो.

लिंगगुणोत्तर या घटकास लोकसंख्या भूगोलात महत्त्वाचे स्थान आहे. कारण लोकसंख्या नियोजनात याला अधिक महत्त्व आहे. अनेक देशामध्ये लिंगगुणोत्तर वेगवेगळ्या पद्धतीने सांगितले जाते. भारतात १००० पुरुषांमागे असणारी स्त्रियांची संख्या किती आहे. यावरुन लिंगगुणोत्तर काढल जाते. महाराष्ट्रात २०११ च्या जनगणनेनुसार सर्वसाधारण लिंगगुणोत्तरात बदल झाला असला तरी सर्वच प्रशासकीय विभागात सारखी परिस्थिती नाही.

मराठवाड्यात २००१ ते २०११ या जनगणनेनुसार बाल लिंगगुणोत्तरात बदल झालेला आहे. म्हणून प्रस्तुत शोधनिबंधात मराठवाड्यातील ० ते ६ वयोगटातील बाल लिंगगुणोत्तराचा अभ्यास केला आहे.

**अभ्यास क्षेत्र :-**

मराठवाडा हा महाराष्ट्र राज्यातील सहा प्रशासकीय [illegible] 74°३५' पूर्व ते ७८°२०' पूर्व व अक्षवृत्तीय विस्तार १७°५०' उत्तर ते २०°४०' उत्तर असा आहे. मराठवाड्याच्या पूर्वेस आंध्रप्रदेश राज्य पश्चिमेस अहमदनगर तर दक्षिणेस कर्नाटक राज्य व उत्तरेस जळगांव, धुळे, बुलढाणा हे जिल्हे आहेत. या विभागाचे क्षेत्रफळ ६४८११ चौ.कि.मी. आहे. या विभागात औरंगाबाद, जालना, बीड, उस्मानाबाद, लातूर, परभणी, हिंगोली व नांदेड असे आठ जिल्हे आहेत.

**उद्दिष्टे :-**

i) ० ते ६ वयोगटातील बाललिंग गुणोत्तराची स्थिती अभ्यासणे.

ii) या वयोगटातील बाललिंग गुणोत्तरामध्ये झालेल्या बदलाचा अभ्यास करणे.

iii) समाधानकारक बाललिंग गुणोत्तरासाठी उपाय सांगणे.

**माहिती स्त्रोत व संशोधन पद्धती :-**

प्रस्तुत शोधनिबंधात द्वितीयक माहिती स्त्रोताचा उपयोग केला आहे. यासाठी विविध संदर्भ ग्रंथ, सामाजिक व आर्थिक समालोचन इ. च्या साह्याने माहिती प्राप्त केली आहे. गोळा केलेल्या माहितीचे सारणीकरण करुन माहितीच्या पृथ:करणासाठी सांख्यिकीय पद्धतीचा वापर करण्यात आला आहे. यात पुढील सूत्राचा आधार घेतला

आहे.

१. सर्वसाधारण लिंगगुणोत्तर

$$\text{लिंग गुणोत्तर} = \frac{\text{एकूण स्त्रियांची संख्या}}{\text{एकूण पुरुषांची संख्या}} \times १०००$$

२. बाललिंग गुणोत्तर

$$\text{बाल लिंग गुणोत्तर} = \frac{\text{६ वर्षा पेक्षा वयोगट कमी असलेल्या मुलींची संख्या}}{\text{६ वर्षा पेक्षा वयोगट कमी असलेल्या मुलांची संख्या}} \times १०००$$

**विषय विवेचन आणि विश्लेषण :-**

**सारणी**

**मराठवाड्यातील ० ते ६ वयोगटातील बाल लिंगगुणोत्तर असलेले जिल्हे**

| अ.क्र. | जिल्हे | जनगणना २००१ | जनगणना २०११ | दोन जनगणनेमधील झालेला बदल (%) |
|---|---|---|---|---|
| १ | बीड | ८९४ | ८०१ | -१०.४० |
| २ | हिंगोली | ९२७ | ८६८ | -६.३६ |
| ३ | जालना | ९०३ | ८४७ | -६.२० |
| ४ | परभणी | ९२३ | ८६६ | -६.१७ |
| ५ | लातूर | ९१८ | ८७२ | -५.०१ |
| ६ | औरंगाबाद | ८९० | ८४८ | -४.७१ |
| ७ | उस्मानाबाद | ८९४ | ८५३ | -४.५८ |
| ८ | नांदेड | ९२९ | ८९७ | -३.४४ |
| | मराठवाडा | ९१० | ८५७ | -५.८२ |

स्त्रोत : जिल्हा जनगणना पुस्तिका

वरील सारणीवरुन मराठवाड्यातील आठही जिल्ह्यातील ० ते ६ वयोगटातील दर १००० बालांमागे बालिकांचे प्रमाण (२००१ ते २०११) खूपच कमी झालेले आहे. हे आकडेवारीवरुन स्पष्ट होते. बीड जिल्ह्यात २००१ च्या जनगणनेनुसार ० ते ६ वयोगटातील बाल लिंगगुणोत्तर ८९४ होते. त्यामध्ये बदल होऊन २०११ च्या जनगणनेनुसार ते ८०१ झाले. बीड जिल्ह्यातील या दोन जनगणनेमधील बदल लक्षणिय तो -१०.४० टक्के आहे. हा बदल चिंतनीय असून अभ्यासकांना विचार करायला लावणारा आहे. हिंगोल जिल्ह्यात २००१ च्या जनगणनेनुसार दर १००० बालांमागे ९२७ बालिकांची नोंद झाली. २०११ च्या जनगणनेप्रमाणे या आकडेवारीचे प्रमाण ८६८ इतके झाले. या जिल्ह्यात दोन जनगणनेतील बदल -६.३६ टक्के इतका झाला आहे. जालना जिल्ह्यात दर १००० बालांमागे २००१ च्या जनगणनेनुसार ९०३ बालिका होत्या. त्या २०११ मध्ये ८४७ इतक्या झाल्या. २००१ ते २०११ च्या दरम्यान या जिल्ह्यात बाललिंग गुणोत्तरात -६.२० टक्के इतका बदल दिसतो. परभणी जिल्ह्यात दर १००० बालांमागे २००१ च्या जनगणनेनुसार ९२३ बालिका होत्या. त्यामध्ये बदल होऊन २०११ मध्ये त्या ८६६ इतक्या झाल्या. २००१ ते २०११ च्या दरम्यान या जिल्ह्यात बाललिंगगुणोत्तरातील बदल -६.१७ इतका आहे.

वरील चारही जिल्ह्याची बाललिंग गुणोत्तराची स्थिती पाहता ती अतिशय गंभीर असून २००१ ते २०११ या जनगणनेनुसार झालेला बदल अभ्यासकाची चिंता वाढवणारा आहे.

वरील चार जिल्ह्यांची तुलना करता खालील चार जिल्ह्याचे बाललिंग गुणोत्तर व २००१ ते २०११ या दोन जनगणनेनुसार झालेला बदल तुलनेत बरा वाटत असला तरी तो योग्य नाही असेच म्हणावे लागेल.

लातूर जिल्ह्यात ० ते ६ वयोगटातील २००१ च्या जनगणनेनुसार १००० बालांमागे ९१८ बालिका होत्या. त्यात बदल होऊन २०११ मध्ये दर १००० बालांमागे ८७२ बालिका असून दोन जनगणनेमधील बदल -५.०१ टक्के झालेला आहे. औरंगाबाद जिल्ह्यात २००१ च्या जनगणनेनुसार ० ते ६ वयोगटातील दर १००० बालांमागे ८९० बालिका असून २०११ च्या जनगणनेनुसार ८४८ इतक्या बालिका आहेत. दोन जनगणनेमधील बदल -४.७१ टक्के एवढा आहे. उस्मानाबाद जिल्ह्यात ० ते ६ वयोगटानुसार २००१ च्या जनगणनेनुसार दर १००० बालांमागे ८९४ इतक्या बालिका आहेत. तर त्याच २०११ च्या जनगणनेनुसार ८५३ बालिकांची नोंद झाली आहे. म्हणजेचे दोन जनगणनेमधील बदल -४.५८ टक्के इतका आहे.

नांदेड जिल्ह्यामध्ये ० ते ६ वयोगटातील दर १००० बालांमागे २००१ च्या जनगणनेनुसार ९२९ बालिका होत्या. त्यात बदल होऊन २०११ च्या जनगणनेनुसार त्या ८९७ इतक्या असून दोन जनगणनेमधील बदल -३.४४ एवढा आहे.

**निष्कर्ष :-**

मराठवाडा हा महाराष्ट्रातील एक मागासलेला प्रशासकीय विभाग असून या विभागाचे ० ते ६ वयोगटातील २००१ च्या जनगणनेनुसार दर १००० बालांमागे ९१० बालिका आहेत तर २०११ च्या जनगणनेनुसार ८५७ बालिका आहेत. म्हणजेच मराठवाड्यातील दोन जनगणनेमधील बदल -५.८२ एवढा आहे. याचा अर्थ असा की मराठवाड्यात २००१ साली बालिका व बालांचे गुणोत्तर ९१०:१००० असे आहे तर २०११ साली बालिका-बालांचे गुणोत्तर ८५७:१००० असे आहे. याचाच अर्थ असा की मराठवाडा बालिका-बालांच्या गुणोत्तरासंबंधी व त्यातील बदलांसंबंधी जागरुक नाही असे खेदाने म्हणावे लागेल. कारण हे चित्र फारच चिंताजनक आहे. मराठवाड्यातील एकाही जिल्ह्यात उपरोक्त विषयी समाधानकारक स्थिती नाही. त्यात बीड, हिंगोली, जालना व परभणी या चार जिल्ह्यात अत्यंत भयावह परिस्थिती असून लातूर, औरंगाबाद, नांदेड व उस्मानाबाद तुलनेत घट कमी असली तरी शोभादायक नाही.

मराठवाड्याच्या दृष्टीनेही बाब अत्यंत लाजिरवाणी असून हे असंतुलन थांबवणे आवश्यक आहे. नसता या विभागाला भविष्यात अनेक वाईट परिणामांना सामोरे जावे लागेल. यासाठी खालील काही उपाय करणे गरजेचे वाटते.

१. बालिकांच्या आरोग्याच्या बाबतीत काळजी घेणे आवश्यक आहे.

२. बाळंतपणाच्या काळात बालिकांचे मृत्यतेचे प्रमाण जास्त आहे. त्यावर चिंतन होणे आवश्यक आहे.

३. मुलीकडे पाहण्याचा दृष्टीकोन मुलाप्रमाणे होणे आवश्यक आहे.

४. मुलीला उच्च शिक्षण देण्यासाठी पालकास समुपदेशन करणे आवश्यक आहे.

५. मुलीला सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यासाठी प्रसारमाध्यमांनी सुद्धा पुढाकार घेतला पाहिजे.

६. मुलीला सर्वच प्रकारचे शिक्षण मोफत दिले पाहिजे.

७. मुलींना नोकरीमध्ये जास्तीचे आरक्षण दिली पाहिजेत.

८. कमी वयात विवाह व हुंडा पद्धती यासाठी कायद्याचे स्वरुप आणखी कडक करुन त्याची अंमलबजावणी झाली पाहिजे.

९. स्त्री व पुरुष हे दोघेही समान आहेत ही मानसिकता दृढ होण्यासाठी चिंतन करुन मार्ग काढले पाहिजेत.

१०. देशातील अति अल्प राज्यात व राज्यातील अतिअल्प जिल्ह्यात बाल-बालिका लिंगगुणोत्तर चांगले आहे, त्याचे अनुसरण केले पाहिजे.

संदर्भ ग्रंथ :-


१. प्रा. शेटे, प्रा. फुले, प्रा. शहापूरकर - लोकसंख्या भूगोल - अभिजित पब्लिकेशन, लातूर

२. प्रा.के.ए. खतीब - लोकसंख्या भूगोल - विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगपूरा, औरंगाबाद.

३. ए.बी. सवदी - द मेगा स्टेट महाराष्ट्र - निराली प्रकाशन, पुणे

४. प्रा.डॉ. पांडूरंग केचे (१९९२) - महाराष्ट्राचा भूगोल - कैलास पब्लिकेशन, औरंगाबाद

५. प्रा.डॉ. विठ्ठल घारपूरे (१९८५) - लोकसंख्या भूगोल - पिंपाळपूरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर

६. महाराष्ट्र शासन (२००१-२०१०) आर्थिक व सामाजिक समालोचन पुस्तिका

७. महाराष्ट्र शासन (२००१-२०१०) आर्थिक पाहणी


**32**

# उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थ्यांच्या भावनिक बुद्धिमतेचा तुलनात्मक अभ्यास


**श्रीमती सिंधू विश्वंभर झोडपे**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद


**प्रस्तावना :**

व्यक्तीच्या व्यक्तीमत्व विकासात त्याच्या प्रत्येक विकासावस्थेचे महत्व अनन्यसाधारण आहे. परिपक्वता आणि अनुभव यांच्या परिणामातून घडून येणाऱ्या परिवर्तनाच्या प्रगतीसुचक मालिकेस विकास असे म्हणतात.

प्रत्येक विकासावस्थेमध्ये व्यक्तीमध्ये विकास विविध प्रकारचे बदल घडून येत असतात. मात्र ज्या कालखंडात विकास प्रक्रियेला गती मिळून अनेक बदल घडतात. त्या बदलाची जाणीव संबंधीतांना तीव्रपणे होते. तो कालखंड म्हणजे कुमारावस्था होय. ज्याला इंग्रजीमध्ये टीन एजर्स असे संबोधले जाते. उच्च माध्यमिक स्तरावरील विद्यार्थी हे कुमारावस्थेतीलच असतात. त्यांच्या भावनांचा अभ्यास करणे महत्वाचे आहे. थोडक्यात विद्यार्थ्यांना स्वतःच्या व इतरांच्या भावना ओळखणे, भावनांची देखरेख करणे, त्यांचे नियमन व नियंत्रण करण्यासाठी सक्षम बनविणे तसेच आपले विचार व कृती यांना मार्गदर्शन करण्यासाठी भावनाचा उपयोग करण्यास शिकवणे तसेच सभोवतालची परिस्थिती व समस्यांशी स्वतःच्या व इतरांच्या नातेसंबंधात जुळवून घेण्याच्या प्रभावी आंतरक्रिया करण्यासाठी उपयोगाचे भान असण्याची क्षमता म्हणजे भावनिक बुद्धिमता होय. खरेतर भावनिक बुद्धिमता म्हणजे हृदय व मस्तक यांचे सुयोग्य मिश्रण होय.

भावनिक बुद्धिमतेची चार क्षेत्रे खालीलप्रमाणे :

**१. भावनांची ओळख :** स्वतःच्या व इतरांच्या भावना ओळखणे.

**२. भावनांची ग्राह्यक्षमता :** (एकात्मीकरण) विचार प्रक्रियेत भावनांचे उपयोजन करणे.

**३. भावनांचे आकलन :** स्वतःचे विचार व वर्तन आणि भावना यामधील परस्पर संबंधीचे अचुक आकलन करण्याची समजण्याची क्षमता.

**४. भावनांचे व्यवस्थापन :** भावनांचे नियमन व नियंत्रणाची क्षमता